# –: नि.दि.दावा क्र.२३९/२०२५ मधील नि.क्र.०८ वरील आदेश :–

*(पारित दि.२०/१२/२०२५)*

**०१.** प्रस्तुत अर्ज वादीने प्रतिवादी क्र.१ ते २ विरूद्ध तुर्तातुर्त ताकीद मिळण्यासाठी दाखल केला असून वादीचे कथन आहे की, मौजे नेर्ली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.९९ ही मिळकत (संक्षेपासाठी यापुढे ज्यास 'दावा मिळकत' असे संबोधले आहे) वादीची वडीलार्जित मालकी हक्क कब्जे वहिवाटीची मिळकत असून सदर मिळकतीमध्ये वादीची फार पुर्वीपासून म्हणजेच सन १९५६–५७ ते आजअखेर जळण–काटुक टाकून शेती सहित व वैरण वगैरे वस्तु ठेवून वादीचे कब्जात आहे, सदर मिळकतीचा मालकी हक्काने वापर उपभोग हे वादी फार पुर्वीपासून करीत आले आहेत, प्रतिवादींची मिळकत क्र.९८ ही त्यांच्या मालकीची असून सदर मिळकत वादीचे मिळकतीचे पुर्वेस असुन वादी व प्रतिवादींचे मिळकतीमध्ये ओढ्यास जाणेचा रस्ता आहे, सदर प्रतिवादींचे मिळकतीमध्ये तात्या रामा धुलुगडे व जगु विठू धुलुगडे यांनी व त्यांचे वारसांनी स्वत:ची घरे बांधून सदरील प्रतिवादींचे मिळकतीमध्ये फार पुर्वीपासून ते राहण्यास आहेत, अशी वस्तुस्थिती असताना वादीची मिळकत दांडगाव्याने हडप करण्याच्या हेतुने व मनातील द्वेषापोटी आकासापोटी दावा मिळकत स्वत:ची असलेबाबतचा गैरसमज करुन घेवून दांडगाव्याने, गैरहक्की व बेकायदेशीरपणे वादींचे मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन बांधकाम करण्याच्या उद्देशाने दि.२०/१०/२०२५ रोजी जागेची आखणी करुन पिलरसाठी खड्डे काढण्याच्या प्रयत्नात प्रतिवादी क्र.१ ते २ आहेत व सदर मिळकत 'माझीच असून या मिळकतीमध्ये आम्ही घर बांधणारच, तुम्हाला काय करायचे ते करा, तुम्ही कोर्टात जावा अगर कोठेही जावा, आम्ही या जागेत घराचे बांधकाम केल्याशिवाय गप्प बसणार नाही' अशी धमकी प्रतिवादींनी वादीस दिली असून प्रतिवादी हे बोलल्याप्रमाणे खरे करुन दाखविल्याशिवाय गप्प बसणार नाहीत व तसे झाले तर वादींना त्यांचे दावा मिळकतीस कायमस्वरुपी मुकावे लागणार असून त्यांचे पैशात अगर कशातही भरुन न येणारे नुकसान होणार आहे, प्रतिवादींनी वादीचे दावा मिळकतीमध्ये घराचे बांधकाम केलेस वादींना मल्टीप्लीसिटी ऑफ प्रोसिडींगला सामोरे जावे लागणार आहे, सदर दाव्याचा अंतिम निर्णय लागणेस बराच कालावधी जाणार असलेने दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी स्वत: अगर त्यांचेतर्फे अन्य कोणीही वादीचे दावा मिळकतीमधील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा करु नये अगर दावा मिळकतीमध्ये कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करु नये अशी प्रतिवादी क्र.१ ते २ यांना दरम्यानची तुर्तातुर्त ताकीद देणेत यावी, अशी वादीने विनंती केली आहे.

**०२.** प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी नि.क्र.३२ येथे तुर्तातुर्त ताकीद अर्जास म्हणणे दिलेले आहे. प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी कथन केले आहे की, वादींचा अर्ज खोटा, काल्पनिक, लबाडीचा व बनावट असून तो प्रतिवादींनी नाकारलेला आहे, दावा मिळकतीचे वर्णन चुकीचे व अपुरे आहे, प्रतिवादींचे मालकीचे जागेमध्ये तात्या रामा

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2025.12.20 17:36:58 +0530

धुलुगडे तसेच जगु विठू धुलुगडे यांचे वारसांनी घरे बांधलेली नाहीत, प्रतिवादींचे मालकीच्या ग्रामपंचायत मिळकत क्र.९८ चे पुर्व बाजूस तात्या धुलुगडे व जगु धुलुगडे यांची घरे आहेत, ग्रामपंचायत मिळकत क्र.९९ या मिळकतींचा फक्त ग्रामपंचायतचा गाव नमुना नं.८ चा उताराचा कागदोपत्री आहे, परंतु जागेवरती वस्तुस्थिती मध्ये त्याठिकाणी सध्या पुर्वी ओढ्यास पाण्याला गाव विहीरीवरती जाणेचा पाऊल वाट वजा रस्ता होता तो सध्या २० ते २५ फुटाचा मोठा सरकारी रस्ता झाला असून सदरचे सरकारी रस्त्यामध्येच ग्रामपंचायत मिळकत क्र.९९ ही पुर्णपणे गेलेली आहे, दावा मिळकत ग्रामपंचायत मिळकत क्र.९९ चा उतारा पाहिला असता त्यामध्ये ४ लोकांची नावे दिसून येतात परंतु सदर दाव्यामध्ये वादी एकटाच दिसून येत आहे, तसेच प्रतिवादींचे मालकीचा ग्रामपंचायत मिळकत क्र.९८ मध्ये ग्रामपंचायतचे उताऱ्यावरती ९ लोकांची नावे नमूद आहेत, परंतु दाव्यात वादीने फक्त दोनच लोकांना प्रतिवादी केलेले आहे, तसेच ग्रामपंचायत मिळकत क्र.९९ चे उताऱ्यावर मालमत्तेचे वर्णन या कॉलममध्ये पडसर खुली जागा ० फुट लांब व ० फुट रुंद असे वर्णन दिलेले आहे, यावरुन वादीने चुकीच्या पध्दतीने दावा दाखल केला आहे सिद्ध होते. मौजे नेर्ली ग्रामपंचायतची स्थापना १९५५ साली झालेली आहे, प्रतिवादी क्र.१ ला महाराष्ट्र शासनाच्या घरकुल योजनेमार्फत घर मंजुर झालेले असून सदरचे घर हे ग्रामपंचायत मिळकत क्र.९८ मध्ये प्रतिवादी क्र.१ ही बांधत आहे, त्याचा १ हप्ता सुद्धा शासनाकडून प्रतिवादी क्र.१ ला रक्कम मिळालेला आहे, प्रतिवादी क्र.१ ने तिचे घराचे बांधकाम बहुतांश पुर्ण केलेले आहे,

**०३.** प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी पुढे कथन केले आहे की, ग्रामपंचायत अभिलेखावरुन ग्रामपंचायत मिळकत क्र.९७,९८,९९,१०० यांचे सन १९५६ पासुनचे मिळकत क्रमांक व चतु:सिमा पाहिल्या असता ग्रामपंचायत मिळकत क्र.९८ ही मिळकत प्रतिवादींचे वडीलोपार्जित मालकी हक्क वहिवाटीची मिळकत असून सदरची मिळकत सन १९५६–५७ साली उस्मानगणी नरुद्दीन मोमीन ८ आणे हिस्सा व अब्दुल बक्सार मोमीन ८ आणे हिस्सा अशी मालकी हक्क वहिवाटीची होती, उस्मानगणी हा अब्दुल यांचे सख्खे भाऊ करीम यांचा नातू आहे. उस्मानगणी याची पत्नी नुरबी ही मयत असून प्रतिवादी क्र.१ ते २ तसेच रशिद, नजमाबी, हनिफा व कुरेशी ही मुले आहेत, त्यापैकी रशिद हा मयत असून शरिना ही पत्नी आहे, तसेच सुमया व जिशानअहमद ही मुले आहेत, ग्रामपंचायत मिळकत क्र.९८ चे उताऱ्यावरील लोक हे सदर मिळकत वंशपरंपरेने अनेक वर्षांपासून वहिवाट करीत आहेत, ग्रामपंचायत मिळकत क्र.९८ चे क्षेत्र पुर्वपश्चिम १०० फुट व दक्षिणउत्तर ५८ फुट अशा मापाची आहेत, सदर ग्रामपंचायत मिळकत क्र.९८ पैकी पश्चिमेकडील ८ आणेचा हिस्सा अब्दुल बक्सर मोमीन यांचे मालकी हक्क वहिवाटीचा होता, अब्दुल हा मयत असून त्यास गणी हा मुलगा आहे, गणी अब्दुल मोमीन यांनी त्यांचा पश्चिमेकडील ८ आणेचा हिस्सा दि.२७/०१/१९९६ रोजी रजिस्टर खरेदीपत्राने श्री.महंमदईसाक हाजीअब्बास मुजावर यांना खरेदी दिलेला आहे, सदर खरेदीपत्राची नोंद

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2025.12.20 17:37:08 +0530

मा.दु.नि.कार्यालय खानापूर विटा यांचेकडे अ.नं.३३६९ ने केलेली आहे, ग्रामपंचायत मिळकत क्र.९८ याचा सन १९९६ साली ग्रामपचांयत मिळकत क्र.५५ असा होता, गणी अब्दुल मोमीन यांचे खरेदीपत्रात ग्रा.मि.नं.५५ असा उल्लेख आहे, सदरचे खरेदीपत्रामध्ये गणी अब्दुल मोमीन यांचे हिश्याची मापेसुद्धा लिहीलेली आहेत, तसेच खरेदीपत्रात चतु:सिमा सुद्धा लिहीलेल्या आहेत. सदर गणी अब्दुल मोमीन यांची मिळकत म्हणजेच प्रतिवादींचे पुर्वहक्कदार यांची मिळकत असा स्पष्ट उल्लेख आहे, श्री.महंमदईसाक हाजी अब्बास मुजावर यांनी ८ आणेचा हिस्सा खरेदी घेतलेनंतर त्यातील ४ आणेचा हिस्सा त्यांची मुलगी नुरजहॉ हिचे नावे ग्रामपंचायत रेकॉर्डला दि.१४/१२/२०११ रोजीचे र.रु.१००/– चे स्टॅम्पवरील संमतीपत्राने केला असून त्यास नवीन ग्रामपंचायत मिळकत क्र.९८/१ असा पडलेला आहे. सन २०११ साली ग्रामपंचायत मिळकत क्र.९८ चा ग्रामपंचायत मिळकत क्र.८९ असा होता, तसेच ग्रामपंचायत मिळकत क्र.९८ पैकी पूर्व बाजूचा ८ आणेचा हिस्सा उस्मानगणी नुरुद्दीन मोमीन यांचे मालकी हक्क वहिवाटीचा होता व आहे, उस्मानगणी हा दि.०८/०२/२००० साली मयत झाला आहे, तसेच नुरबी ही दि.१३/०७/२०१४ ला मयत झाली आहे व रशिद उस्मान मोमीन हा दि.१७/०५/२००१ ला मयत झाला असून त्यांना प्रतिवादी व इतर लोक हे वारस आहेत.

**०४.** प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी पुढे कथन केले आहे की, ग्रामपंचायत मिळकत क्र.९८ चे पश्चिम बाजूने ओढ्यास जाणारा तसेच पाण्यास जाणारा रस्ता आहे, वादीने दाव्यात ग्रामपंचायत मिळकत क्र.९९ च्या दिलेल्या चतु:सिमा पुर्णपणे चुकीच्या आहेत, ग्रामपंचायत मिळकत क्र.९९ ची जागा जुना ओढ्यास व पाण्यास जाणाऱ्या रस्त्याची पाउलवाट होती तो रस्ता सध्या २० ते २५ फुटाचा झाला असलेमुळे ग्रामपंचायत मिळकत क्र.९९ ही रस्त्यातच पुर्णपणे गेलेला आहे, सदर आज रोजीचे परिस्थीतीप्रमाणे ग्रामपंचायत मिळकत क्र.९८ चे पश्चिम बाजूस २० ते २५ फुट असा रस्ता आहे, सदर ओढ्यास जाणेचे रस्त्याचे पश्चिम बाजूस मुजावर लोकांची जागा असून सदर जागेसंदर्भात सन २००९–१० साली जैनुद्दीन मुजावर यांनी कडेगांव न्यायालयात दावा सुद्धा दाखल केलेला होता, ग्रामपंचायत मिळकत क्र.९८ चे दक्षिण बाजूस याकुब हशम मुजावर व सिलेमान हशम मुजावर यांची खुली जागा याचा जुना ग्रामपंचायत मिळकत क्र.४६ असा आहे, सिलेमान हाशम मुजावर यांनी त्यांचा निम्मा हिस्सा शरद भिकू पवार व संदीप भिकू पवार यांना खरेदी दिलेला आहे, ग्रामपंचायत मिळकत क्र.९८ मध्ये पुर्वेकडील ८ आणेचे हिश्यामध्ये प्रतिवादी क्र.१ व २ यांनी सन २०२० साली दक्षिणपुर्व कोपऱ्यात बोअर पाडलेली आहे, सदर बोअरवरती मोटरसुद्धा बसविलेली आहे, तसेच ग्रामपंचायत मिळकत क्र.९८ मध्ये उत्तरेकडील मुख्य रस्त्यालगत प्रतिवादी क्र.१ चा मुलगा रमजान याचे पानपट्टीचे व चिकनचे दुकान १० वर्षांपासून आहे, ग्रामपंचायत मिळकत क्र.९८ चे पुर्व बाजूस वाणी व जंगम या लिंगायत समाजाची स्मशानभुमी शंकर गोविंदा देशमुखे व

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2025.12.20 17:37:17 +0530

कृष्णाबाई रंगू राजमाने यांचे खाजगी जागेत सन १९५६–५७ साली होती, सदर स्मशानभुमीचा ग्रामपंचायत मिळकत क्र.४३ असा जुना होता, सदर ग्रामपंचायत मिळकत क्र.४३ पैकी दक्षिणेकडील पुर्वपश्चिम ३५ हात व दक्षिणउत्तर २२ हात इतकी जागा श्री.तात्या रामा धुलुगडे व जगू विठू धुलुगडे यांनी सन १९६८ चे दरम्यान दि.०४/०७/१९६८ रोजी शंकर गोविंदा देशमुखे व कृष्णाबाई रंगू राजमाने कडून खरेदी घेवून त्यामध्ये घर बांधलेले आहे, सदरचे धुलुगडे यांचे खरेदीपत्र मा.दु.नि.खानापूर विटा यांचेकडे अ.नं.२०४६ ने नोंद केलेले आहे, सदरचे धुलुगडे यांचे खरेदीपत्रात सुद्धा पश्चिम बाजूस उस्मानगणी व अब्दुल बक्सार यांची खुली जागा असे चतु:सिमेमध्ये वर्णन लिहीलेले आहे, तसेच सध्या ग्रामपंचायत मिळकत क्र.४३ मध्ये दक्षिण बाजूस धुलुगडे यांचे वारसांनी नवीन बंगला सुद्धा बांधलेला आहे, तसेच ग्रामपंचायत मिळकत क्र.४३ मध्ये उत्तर बाजूस पुर्वी लिंगायत समाजाची स्मशानभुमी होती, सध्या सदर स्मशानभुमीचा वापर बंद आहे, धुलुगडे यांचा सध्याचा घर क्र.६४४/२ असा ग्रा.मि. नंबर आहे, तानाजी जगन्नाथ धुलुगडे यांचे घर आहे, सदर जुना ग्रामपंचायत मिळकत क्र.४३ चे पुर्व बाजूने दक्षिणउत्तर असा रस्ता आहे, तो रस्ता पुढे उत्तरेकडील मुख्य रस्त्यास मिळून पुढे पश्चिमेकडून वळून पुढे उत्तरेकडे असा ओढ्यास व शिवाजीनगर गावी जातो, सदर जुना ग्रामपंचायत क्र.४३ चे दक्षिण बाजूस केरु गोविंदा पवार, नारायण गोविंदा पवार यांची ग्रामपंचायत मिळकत क्र.४२ ही मिळकत आहे, सदर केरु पवार यांनी त्यांची जागा रामचंद्र व लक्ष्मण मोहिते यांना खरेदी दिलेली आहे, प्रतिवादींचे मालकीची जागा हडप करणेसाठी वादींनी खोट्या व लबाडीच्या दाव्याची उभारणी केलेली आहे, वादी हे न्यायालयामध्ये स्वच्छ हाताने आलेले नाहीत, दाव्यास दिलेले कारण खोटे व लबाडीचे असून दावा दाखल करणेस कधीही कारण घडले नाही, सन २०२५ चे ऑक्टोंबर महिन्यामध्ये वादी व प्रतिवादी यांचे भांडण झालेले नाही, दाव्याचे कामी न्यायाचा तराजू प्रतिवादी क्र.१ ते २ यांचे बाजूने झुकत आहे, तसेच प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी सदर दाव्याचे कामी प्रथमदर्शनी केस शाबीत केलेली आहे, नि.क्र.५ चा वादीचा तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज मंजूर केलेस प्रस्तुत प्रतिवादी क्र.१ ते २ यांचे पैशामध्ये कधीही न भरुन येणारे अपरिमीत असे नुकसान होणार आहे, त्यामुळे, प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी प्रस्तुत तुर्तातुर्त ताकीदीसाठीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**०५.** प्रस्तुत अर्जातील आपल्या कथनांच्या पृष्ट्यर्थ वादीने खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे.

| **अ.क्र.** | **नि.क्र.** | **कागदपत्राचा तपशील** |
|---|---|---|
| १ | ३/१ | मौजे नेर्ली येथील मालमत्ता क्र.९९ चा ८अ चा उतारा |
| २ | ३/२ | मालमत्ता क्र.९९ चे दोन फोटो |
| ३ | १७/१ | दावा मिळकतीचे चार फोटो |

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2025.12.20 17:37:26 +0530

| | | |
|---|---|---|
| ४ | २७/१ | दि.०४/०७/१९६८ रोजीचे खरेदीपत्राची छायांकीत प्रत, |
| ५ | २७/२ | सन १९५६–५७ ते १९५८–५९ चा ८अ चा उतारा, |
| ६ | २७/३ | सन १९६८ ते १९७१ चा ८अ चा उतारा, |
| ७ | २७/४ | सन १९९५–९६ ते १९९९–२००० चा ८अ चा उतारा |
| ८ | २७/५ | ग्रामपंचायत नेर्ली येथील दि.१३/१०/२०१५ रोजी झालेला ठराव |
| ९ | ३१/१ | मौजे नेर्ली येथील मालमत्ता क्र.९९ चा ८अ चा उतारा, |
| १० | ३१/२ | दावा मिळकतीचा कच्चा हात नकाशा, |
| ११ | ३१/३ | दावा मिळकतीचा वस्तुस्थितीदर्शक नकाशा |
| १२ | ४०/१ | मौजे नेर्ली येथील मिळकत क्र.२१ चा ८अ चा उतारा |
| १३ | ४०/२ | वादीची मिळकत क्र.९९ चे दक्षिण बाजूकडील रस्त्याचा उतारा |
| १४ | ४०/३ | हणमंत दत्तू शिंदे यांची मिळकत क्र.४० चा उतारा |
| १५ | ४४/१ | सरपंच ग्रामपंचायत नेर्ली यांनी केलेल्या तक्रारीची प्रत |

**०६.** प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी आपल्या कथनांच्या पृष्ट्यर्थ खालीलप्रमाणे कागदोपत्री पुरावा दाखल केलेला आहे.

| अ.क्र. | नि.क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १ | २५/१ | सफुरा पठाण यांचे आधारकार्डची छायांकीत प्रत |
| २ | २५/२ | शफिक मोमीन यांचे आधारकार्डची छायांकीत प्रत |
| ३ | २५/३ | मौजे नेर्ली येथील मिळकत क्र.४४ चा सन १९५६–५७ चा नमुना ८ चा उतारा |
| ४ | २५/४ | मौजे नेर्ली येथील मिळकत क्र.९८ चा सन २०१४–१५ ते २०१५–१६ चा नमुना ८ चा उतारा |
| ५ | २५/५ | मौजे नेर्ली येथील मिळकत क्र.९८ चा सन २०१५–१६ ते २०१८–१९ चा नमुना ८ चा उतारा |
| ६ | २५/६ | मौजे नेर्ली येथील मिळकत क्र.९८ चा सन २०२३ ते २०२७ चा नमुना ८ चा उतारा |
| ७ | २५/७ | मौजे नेर्ली येथील मिळकत क्र.४४ मधील बोअरचा फोटो |
| ८ | २५/८ | बोअरचे लाईटबिल |
| ९ | २५/९ | खुषखरेदीपत्र दस्त क्र.३३६९/१९९६ ची छायांकीत प्रत |

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2025.12.20 17:37:35 +0530

| | | |
|---|---|---|
| १० | २५/१० | खरेदीपत्र दस्त क्र.२०४६/१९६८ ची छायांकीत प्रत |
| ११ | २५/११ | दि.१४/०५/२०१२ रोजीचे संमतीपत्राची छायांकीत प्रत |
| १२ | २९/१ | मौजे नेर्ली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.४४,४६ चा सन १९५६–५७ ते १९५८–५९ चा उतारा |
| १३ | २९/२ | मौजे नेर्ली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.४२, ४३, ४४ चा सन १९७१–७२ ते १९७५–७६ चा उतारा |
| १४ | २९/३ | मौजे नेर्ली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.५५ चा सन १९६८–६९ ते १९७२–७३ चा उतारा |
| १५ | २९/४ | मौजे नेर्ली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.५२ चा सन १९७७–७८ ते १९८१–८२ चा उतारा |
| १६ | २९/५ | मौजे नेर्ली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.५३ चा सन १९८२–८३ ते १९८५–८६ चा उतारा |
| १७ | २९/६ | मौजे नेर्ली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.५३ चा सन १९८६–८७ ते १९८९–९० चा उतारा |
| १८ | २९/७ | मौजे नेर्ली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.५५ चा सन १९९०–९१ ते १९९३–९४ चा उतारा |
| १९ | २९/८ | मौजे नेर्ली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.५५ चा सन १९९४–९५ ते १९९९–२००० चा उतारा |
| २० | २९/९ | मौजे नेर्ली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.८१ चा सन २०००–२००१ ते २००४–२००५ चा उतारा |
| २१ | २९/१० | मौजे नेर्ली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.८१ चा सन २००५–२००६ ते २००८–२००९ चा उतारा |
| २२ | २९/११ | मौजे नेर्ली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.८९ चा सन २००९–२०१० ते २०१३ चा उतारा |
| २३ | २९/१२ | मौजे नेर्ली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.९८ चा सन २०१३ ते २०१६ चा उतारा |
| २४ | २९/१३ | मौजे नेर्ली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.९८,९८/१ चा सन २०१५–१६ ते २०१८–१९ चा उतारा |
| २५ | २९/१४ | मौजे नेर्ली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.९८ चा सन २०२३ ते २०२७ चा उतारा |

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2025.12.20 17:37:46 +0530

| | | |
|---|---|---|
| २६ | २९/१५ | मौजे नेर्ली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.४४ ची सन १९५८ ची ग्रामपंचायत कराची पावती |
| २७ | २९/१६ | मौजे नेर्ली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.९८ ची सन २०२५ ची ग्रामपंचायत कराची पावती |
| २८ | २९/१७ | मौजे नेर्ली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.४६ चा सन १९५५–५६ ते १९५८–५९ चा उतारा |
| २९ | २९/१८ | मौजे नेर्ली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.५२ चा सन १९६८–६९ ते १९७१–७२ चा उतारा |
| ३० | २९/१९ | मौजे नेर्ली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.५४ चा सन १९७७–७८ ते १९८१–८२ चा उतारा |
| ३१ | २९/२० | मौजे नेर्ली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.५५ चा सन १९८६–८७ ते १९८९–९० चा उतारा |
| ३२ | २९/२१ | मौजे नेर्ली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.५७ चा सन १९९४–९५ ते १९९९–२००० चा उतारा |
| ३३ | २९/२२ | मौजे नेर्ली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.८३ चा सन २००५–२००६ ते २००८–२००९ चा उतारा |
| ३४ | २९/२३ | मौजे नेर्ली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.१०० चा सन २०१३–१४ ते २०१५–१६ चा उतारा |
| ३५ | २९/२४ | मौजे नेर्ली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.१०० चा सन २०१९–२०२० ते २०२२–२०२३ चा उतारा |
| ३६ | ३४/१ | मौजे नेर्ली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.६४४/२ चा ८अ उताऱ्याची प्रत |
| ३७ | ३४/२ | प्रधानमंत्री आवास योजना घरकुलचे मंजूरीपत्राची छायांकीत प्रत |
| ३८ | ३४/३ | घर बांधणेसाठी दिलेले प्रतिवादीचे संमतीपत्राची छायांकीत प्रत |
| ३९ | ३६/१ | वाद मिळकत व इतर लगतच्या मिळकती यांचे दोन फोटो |
| ४० | ३६/२ | मौजे नेर्ली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.९८ मधील प्रतिवादी क्र.१ चा मुलगा रमजानच्या पाणीपट्टी व चिकन दुकानाचे फोटो |
| ४१ | ३८/१ | नुरजहॉ मोमीन यांचे आधारकार्डची छायांकीत प्रत |
| ४२ | ३८/२ | मौजे नेर्ली येथील मिळकत क्र.९८ मधील नुरजहॉ मोमीन यांच्या घराचा फोटो |

MADHAVI RAMESH PATKAR
Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR
Date: 2025.12.20 17:37:56 +0530

| | | |
|---|---|---|
| ४३ | ३८/३ | रमजान रहीम पठाण यांचे महाराष्ट्र चिकन सेंटर व पानपट्टी तसेच नुरजहॉ यांच्या घराचा एकत्रीत फोटो |
| ४४ | ४२/१ | मौजे नेर्ली येथील सि.स.नं.५११ चा उतारा |
| ४५ | ४२/२ | मौजे नेर्ली येथील सि.स.नं.५१२ चा उतारा |
| ४६ | ४२/३ | मौजे नेर्ली येथील सि.स.नं.५१३ चा उतारा |
| ४७ | ४२/४ | मौजे नेर्ली येथील सि.स.नं.५४३ चा उतारा |

**०७.** वादी व प्रतिवादी क्र.१ ते २ यांच्यातर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत खटल्यात दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. अभिलेखाचे अवलोकन केल्यानंतर खालील वादबिंदू माझ्या विचारार्थ येत असून त्यावरील माझे निष्कर्ष कारणासहीत खाली नोंदविले आहेत–

| **अ.क्र** | **वादबिंदू** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीने सकृतदर्शनी केस आपल्या बाजुने असल्याचे शाबीत केले आहे का ? | नाही. |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे, असे वादीने शाबीत केले आहे का ? | नाही. |
| ३. | तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजुर झाल्यास वादीचे कशानेही न भरुन येणारे असे नुकसान होईल, असे वादीने शाबीत केले आहे का ? | नाही. |
| ४. | काय आदेश ? | नि.क्र.०८ चा अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

# कारणमीमांसा

**०८.** प्रस्तुत खटल्यातील अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मौजे नेर्ली येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.९९ ही दावा मिळकत वादीची वडीलार्जित मालकी हक्क कब्जे वहिवाटीची मिळकत असून प्रतिवादींची मिळकत क्र.९८ ही प्रतिवादींच्या मालकीची असून प्रतिवादींचे मिळकतीमध्ये तात्या रामा धुलुगडे व जगु विठू धुलुगडे यांनी व त्यांचे वारसांनी स्वत:ची घरे बांधून सदरील प्रतिवादींचे मिळकतीमध्ये फार पुर्वीपासून ते राहण्यास आहेत, वादीची मिळकत दांडगाव्याने हडप करण्याच्या हेतुने व मनातील द्वेषापोटी, आकसापोटी दावा मिळकत स्वत:ची असलेबाबतचा गैरसमज करुन घेवून दांडगाव्याने, गैरहक्की व बेकायदेशीरपणे वादीचे मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन बांधकाम करण्याच्या उद्देशाने प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी दि.२०/१०/२०२५ रोजी जागेची आखणी करुन पिलरसाठी खड्डे काढुन बांधकाम सुरु केल्याने दाव्याचा अंतिम

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2025.12.20 17:38:02 +0530

निकाल लागेपर्यंत प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी स्वत: अगर त्यांचेतर्फे अन्य कोणीही वादीचे दावा मिळकतीमधील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा करु नये अगर दावा मिळकतीमध्ये कोणत्याही स्वरुपाचे बांधकाम करु नये अशी प्रतिवादी क्र.१ ते २ यांना दरम्यानची तुर्तातुर्त ताकीद देणेसाठी वादीने विनंती केली आहे. याउलट, प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी कथन केले आहे की, वादीने दाव्यात दिलेल्या नेर्ली ग्रामपंचायत मिळकत क्र.९९ या दावा मिळकतीच्या चतु:सिमा चुकीच्या आहेत व प्रतिवादी क्र.१ ते २ हे आपल्या वडीलार्जित मालकी, वहिवाटीच्या नेर्ली ग्रामपंचायत मिळकत क्र.९८ या मिळकतीमध्ये बांधकाम करत आहेत, त्यामुळे, प्रस्तुत तुर्तातुर्त ताकीदीसाठीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

**०९.** अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दोन्ही पक्षांनी आपल्या कथनांच्या पुष्टयर्थ सन १९५६ पासूनचे नमुना नं.८ ग्रामपंचायत कर आकारणी नोंदवहीचे उतारे दाखल केले आहेत. प्रतिवादी क्र.१ ते २ यांनी दिलेले नि.क्र.३२ वरील कैफियत व म्हणणे तसेच दोन्ही पक्षांच्या विधीज्ञांच्या युक्तीवादावरुन सन १९५६–१९५७ च्या नमुना नं.८ ग्रामपंचायत कर आकारणी नोंदवहीला वादीची दावा मिळकत नेर्ली ग्रामपंचायत मिळकत क्र.९९ चा ग्रामपंचायत मिळकत क्र.४५ असा होता व प्रतिवादींची मिळकत नेर्ली ग्रामपंचायत मिळकत क्र.९८ चा ग्रामपंचायत मिळकत क्र.४४ असा होता, असे स्पष्ट होते. नेर्ली ग्रामपंचायत मिळकत क्र.४४ व ४५ च्या सन १९५६–१९५७ च्या नमुना नं.८ ग्रामपंचायत कर आकारणी नोंदवहीचा उतारा वादीने नि.क्र.२७/२ येथे दाखल केला असून प्रतिवादींनी नि.क्र.२५/३ येथे दाखल केला आहे. नेर्ली ग्रामपंचायत मिळकत क्र.४४ व ४५ च्या सन १९५६–१९५७ च्या नमुना नं.८ ग्रामपंचायत कर आकारणी नोंदवहीच्या उताऱ्यात नेर्ली ग्रामपंचायत मिळकत क्र.४५ म्हणजेच सध्याची वादीची दावा मिळकत नेर्ली ग्रामपंचायत मिळकत क्र.९९ च्या चतु:सिमा "पुर्वेस रस्ता ओढयास जाणेचा, दक्षिणेस रस्ता, उत्तरेस हमरस्ता, पश्चिमेस शाळगांवकर यांची जागा" अशा नमुद आहेत. मात्र, वादीने दाव्यात व प्रस्तुत अर्जात दिलेल्या दावा मिळकत क्र.९९ च्या चतु:सिमा "पुर्वेस ओढयाला जाणेचा रस्ता, दक्षिणेस याकुब हाराम मुजावर, पश्चिमेस शाळगांवकर यांची जागा, उत्तरेस हमरस्ता," अशा आहेत व वादीने दिलेल्या सदर चतु:सिमापैकी वादीची दावा मिळकत नेर्ली ग्रामपंचायत मिळकत क्र.९९ च्या "दक्षिणेस याकुब हाराम मुजावर यांची जागा" असल्याचे अभिलेखावर दाखल असलेल्या सन १९५६ पासूनच्या नमुना नं.८ ग्रामपंचायत कर आकारणी नोंदवहीच्या उताऱ्यांवरुन दिसून येत नाही. उलटपक्षी, नेर्ली ग्रामपंचायत मिळकत क्र.४४ व ४५ च्या सन १९५६–१९५७ च्या नमुना नं.८ ग्रामपंचायत कर आकारणी नोंदवहीच्या उताऱ्यात नेर्ली ग्रामपंचायत मिळकत क्र.४४ म्हणजेच सध्याची प्रतिवादींची मिळकत नेर्ली ग्रामपंचायत मिळकत क्र.९८ च्या चतु:सिमामध्ये दक्षिणेस याकुब हशम मुजावर यांची जागा असल्याचे दिसत असल्याने अभिलेखावर दाखल असलेल्या सन १९५६ पासूनच्या

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2025.12.20 17:38:11 +0530

नमुना नं.८ ग्रामपंचायत कर आकारणी नोंदवहीच्या उताऱ्यांवरुन “वादीने दाव्यात दिलेल्या नेर्ली ग्रामपंचायत मिळकत क्र.९९ या दावा मिळकतीच्या चतु:सिमा चुकीच्या आहेत” असे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे, वादीच्या दावा मिळकतीची स्थाननिश्चीती स्पष्ट होत नसल्याने वादीचा दावा मिळकतीमध्ये ताबा असल्याचा प्रथमदर्शनी निष्कर्ष काढता येत नाही.

**१०.** वादी व प्रतिवादींच्या कथनांची पडताळणी करण्यासाठी अभिलेखावरील कागदोपत्री पुराव्यामध्ये केवळ सन १९५६ पासूनचे नमुना नं.८ ग्रामपंचायत कर आकारणी नोंदवहीचे उतारे दाखल असुन त्यावरून “वादीने दाव्यात दिलेल्या नेर्ली ग्रामपंचायत मिळकत क्र.९९ या दावा मिळकतीच्या चतु:सिमा चुकीच्या आहेत” असे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने वादीच्या दावा मिळकतीमध्येच प्रतिवादी क्र.१ ते २ हे बांधकाम करत असल्याचे वादीने प्रथमदर्शनी सिद्ध केलेले नाही. त्यामुळे, प्रस्तुत दावा प्रथमदर्शनी वादीच्या बाजूने नाही, असे स्पष्ट होते. परिणामी, वादीने प्रथमदर्शनी केस शाबीत केलेली नसल्यामुळे तौलानिक बाबींचा विचार करता न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे, असे म्हणता येत नाही. त्यामुळे, सद्यस्थितीत तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजुर झाल्यास वादीचे कशानेही न भरुन येणारे असे नुकसान होईल असे वादीने सिद्ध केलेले नाही, असे स्पष्ट होते. सबब, प्रतिवादी क्र.१ ते २ विरूद्ध तुर्तातुर्त ताकीद मिळण्यास वादी पात्र नाही, असा निष्कर्ष निघतो. परिणामी, वादबिंदू क्र.१ ते ३ चे उत्तर मी 'नकारार्थी' देते आणि वादबिंदु क्र.४ च्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते–

**०१.** वादीचा नि.क्र.८ वरील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

**०२.** अर्जाचा खर्च दाव्यासोबत.

MADHAVI RAMESH PATKAR Digitally signed by MADHAVI RAMESH PATKAR Date: 2025.12.20 17:38:25 +0530

**स्थळ : कडेगांव**
**दिनांक :२०/१२/२०२५**

**(श्रीम.माधवी र. पाटकर)**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर,कडेगांव**